दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे

सुख-समृद्धी, धनसंपदा, सुदृढ आरोग्य
यांचा वास आपल्या घरात सदैव राहो..
दिवाळी लक्ष्मीपुजन
निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा..
-संपादक

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार दि.१ नोव्हेंबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -७३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

### परळीकरांची बदनामी करणाऱ्यांना मतदानातून धडा शिकवा-धनंजय मुंडे

## भावसार समाज,गोंधळी समाज,गवळी समाज तसेच जैन समाजातील बांधवांच्या धनंजय मुंडेंच्या उपस्थितीत मॅरेथॉन बैठका

**परळी । प्रतिनिधी**

सातत्याने काही लोक निवडणुकीच्या तोंडावर परळीत गुंडगिरी, दहशत वगैरे शब्द वापरून परळी शहराची व शहरातील रहिवाशांची बदनामी करत आहेत. इथे सर्व समाजातील लोक गुण्या-गोविंदाने राहतात. परळी हे कायम विकसनशील शहर आहे, या शहराची व शहरातील लोकांची बदनामी करणाऱ्यांना आता जनतेने मतदानातून उत्तर द्यावे, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी परळी येथे बोलताना केले आहे. परळी शहरातील भावसार समाज, गोंधळी समाज, गवळी समाज, रावळ समाज, तसेच जैन समाजातील बांधवांच्या धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत आज मॅरेथॉन बैठका संपन्न झाल्या. यावेळी धनंजय मुंडे यांनी विविध समाज बांधवांच्या समस्या तसेच मागण्या समजून घेतल्या. समाज बांधवांच्या विविध मंदिरांची उभारणी तसेच सभागृहांच्या उभारणीसाठी जागेसह निधीचे प्रश्न सोडवले जातील, तसेच ज्या ठिकाणी रस्ते व विजेची समस्या आहे ते प्रश्न निवडणूक क्षमताच प्राधान्याने सोडवले जातील अशी ग्वाही यावेळी धनंजय मुंडे यांनी दिली. कधी म्हणतात परळीत बोगस बूथ आहेत, कधी म्हणतात परळीतल्या लोकांनी बोगस मतदान केले, इथल्या लोकांच्या भावनांचा व आमच्यावरील प्रेमाचा अनादर करून यांना केवळ परळीची बदनामी साधायची आहे अशा लोकांना जनतेने मतदानातूनच धडा शिकवावा असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले.या बैठकांना राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्यासह सुरेश अण्णा टाक, अय्युब पठाण, प्रा.विनोद जगतकर, ॲड.मनजीत सुगरे, दत्ताभाऊ सावंत, चेतन सौंदळे, महेंद्र रोडे, अनिल अष्टेकर, यांच्यासह प्रभाकर हजारे, गोपाळ मामा, सारिका तांदळे, विलास सुगावे, अरुण अर्धापुरे, बाबू काका तांदळे, गवळी समाजातील मुन्ना बागवाले, अरुण चिखले, नितीन बागवाले, मारुती काळे, बापू शिंदे, संभाजी काळे, बंडू बागवाले,सोनाप्पा बागवाले, गोंधळी व रावळ समाजातील जगदीश इगवे, दत्ता दुलदुले, राहुल इगवे, वैजनाथ घोटकर, दीपक सुपले, सचिन मांडे, गणपत इगवे, लिंबाजी ढवळे, रतन मिरगे, नरसिंह मिरगे, गजानन रेणुके यांसह विविध समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## लक्ष्मी मातेचे वाहन घुबड अशुभ ते कसले, ते तर शुभ लक्षणाचे प्रतीक-सृष्टी सोनवणे

### लक्ष्मीच्या हजारो वाहन घुबडांची सृष्टी सोनवणे यांच्याकडून दुरुस्ती

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

भारतीय संस्कृतीमध्ये देवी लक्ष्मीचे वाहन असलेल्या हजारो घुबडांना सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्राच्या संचालिका सृष्टी सोनवणे यांनी दुरुस्त करून नवजीवन दिलेले आहे. आज दी १ नोव्हेंबर सायंकाळी लक्ष्मीपूजनाच्या वेळी उपचारानंतर पूर्णपणे बरे झालेल्या घुबडास निसर्गातमुक्त करणार आहेत.

सृष्टी सोनवणे ह्या गेल्या २३ वर्षापासून सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून जखमी,आजारी व आईपासून दुरावलेल्या वन्यजीवांची सेवा सुश्रूषा करतात. त्यांनी १६००० वन्यजीवांवर औषध उपचार करून त्यांना नवजीवन देत विश्वविक्रम केलेला आहे. तसेच हजारो जखमी, आजारी व आईपासून दुरावलेल्या शृंगी घुबड, गव्हानी घुबड, रक्तलोचनी घुबड, मत्स्य घुबड, आखूड कानाचे घुबड, पिंगळा आदी घुबडांवर उपचार करून त्यांना दुरुस्त केलेले आहे.घुबड हे माता लक्ष्मीचे वाहन म्हणून भारतीय संस्कृतीमध्ये ओळखले जाते.

घुबडा विषयी बोलताना सृष्टी सोनवणे म्हणाले की, आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये माता लक्ष्मीचे वाहन म्हणून घुबडाला ओळखले जाते. घुबड पाहणे हे अशुभ नाही तर शुभ लक्षणाच प्रतीक आहे.



घुबड हा वैशिष्ट्यपूर्ण असा पक्षी आहे. महाराष्ट्रात घुबडाच्या १३ प्रजाती आढळून येतात.

घुबडाचे डोळे हे मोठे व डोक्यासमोर असतात. त्यामुळे त्यास रात्रीच्या वेळी चांगले दिसते .शिवाय उडताना त्यांच्या पंखाचा आवाज होत नाही. त्यामुळे रात्रीच्या वेळी त्यांना उंदीर,साप, कीटक यांची शिकार करणेही सोपे जाते. घुबड आपली मान२७० अंश डिग्री पर्यंत फिरवतो शिवाय त्याचा रात्रीच्या धीर गंभीर आवाजाच्या घुत्सराणे छातीत धडकी भरते .त्यामुळे अशा या वैशिष्ट्यपूर्ण पक्षाबद्दल समाजामध्ये काल्पनिक आणि अतिरंजक गोष्टीतून गैरसमजामुळे अंधश्रद्धा पसरली गेलेली आहे . असे हे वैशिष्ट्यपूर्ण घुबड लक्ष्मीचे वाहन असेल तर तो अशुभ तो कसा असणार. खरंतर तो शुभ लक्षणाच प्रतीक आहे. निसर्गातील अन्नसाखळीचा महत्त्वाचा दुवा आहे .त्यामुळे या लक्ष्मीपूजनाच्या दिवसाचे औचित्य साधून आपण या दुर्मिळ होत चाललेल्या लक्ष्मीच्या वाहनाला वाचवण्याचा प्रयत्न करूयात.






# सावधान ! ५० हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम स्वत:जवळ बाळगू नका

## पोलिस चौकशी करणार : पैसे कोठून आले, याचे द्यावे लागणार पुरावे

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

गंगापूर : दिवाळी आहे, कपडे, सोने- नाणे खरेदी करण्यासाठी तुम्ही बाजारपेठेकडे निघालाय. तुमच्याकडे ५० हजार रुपयांहून अधिक रोख रक्कम असेल तर सावधान. तुमचे वाहन पोलिस नाक्यावर अडवतील, तपासणी होईल. रोख रक्कम आढळली तर तुम्हाला ती कोठून आली, याचे पुरावे द्यावे लागतील. पोलिसांचे समाधान झाले तर तुम्हाला सोडले जाईल, अन्यथा तुमची रक्कम जप्त करून त्यावर सुनावणी सुरू होईल. विधानसभा निवडणूक जाहीर झाली असल्याने आचारसंहिता लागू आहे. या काळात आर्थिक उलाढालीवर जिल्हा प्रशासन आणि पोलिस दलाचे संपूर्णकॅमेऱ्यासमोर होणार तपासणी तालुक्यात येणाऱ्या प्रत्येक ठिकाणी पोलिसांनी चेकनाके उभे केले आहेत. तेथे कॅमेऱ्यांसमोर वाहनांची तपासणी होणार आहे. शिवाय, अन्यत्र तपासणी व चौकशी होत असताना एक कॅमेरामन पोलिसांसोबत असेल तो त्या घडामोडी कॅमेराबद्ध करणार आहे.

लक्ष असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केले. त्यामुळे लोकांनी या गोष्टी समजून घ्याव्यात, नियम समजून घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यासाठी नागरिकांनी अधिकाधिक ऑनलाइन व्यवहार करावेत, दिवाळीच्या खरेदीसाठी जात आहात आणि तुमच्याकडे रोख रक्कम

आहे, तर ती कोठून आणली, याबाबतचे पुरावे जरूर सोबत ठेवावेत. जसे की, बँकेतून रक्कम काढली असेल तर पासबुक सोबत बाळगावे. दूध डेअरीचे बिल आले असेल तर त्याची पावती सोबत असावी. शेतमाल विकला असेल तर व्यापाऱ्याची पावती सोबत ठेवावी. काहीच सोबत नसेल तर किमान ते पैसे तुमचे कष्टाचेच आहेत हे सिद्धच करावे लागेल. जर सिद्ध करता आले नाही तर मात्र ती रक्कम जप्त केली जाईल. त्याची पावती दिली जाईल आणि त्यावर सुनावणी चालेल. पुढील एका आठवड्यात सुनावणीवर निर्णय घेतला जाईल. दिवाळीनिमित्त खरेदी हमखास असते. आता एक तोळा सोने घ्यायचे, तर ७० हजार रुपये लागतात. शेतकरी कुटुंबाकडे असणाऱ्या रोख रकमेला पावत्या कोठून आणायच्या, हा प्रश्न असतो, त्यामुळे दिवाळी खरेदीची अनेकांची पंचाईत होणार आहे. सामान्यांना आम्ही त्रास देणार नाही, शंका आली तर कायदेशीर कार्यवाही अटळ असेल, असे निवडणूक विभागाकडून कळविण्यात आले आहे



# बाळासाहेबांची प्रकृती स्थिर, तुम्ही तुमचे मतदारसंघ सांभाळा

## सुजात आंबेडकरांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**

मीडियाच्या माध्यमातून मी मीडिया आणि कार्यकर्त्यांना विनंती करतो की, इकडे खूप मोठी डॉक्टरांची टीम आहे, सपोर्टींग स्टाफ आहे, जो बाळासाहेबांची काळजी घेत आहे. त्यामुळे हॉस्पिटल आणि स्टाफ यांना त्रास होईल अशी कोणतीही कृती करू नका. माझी सर्व कार्यकर्त्यांना विनंती आहे की, आपापले मतदारसंघ सांभाळा, ते सोडू नका आम्ही सर्व बाळासाहेबांच्या सोबत असल्याचे वंचित बहुजन युवा आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी



म्हटले आहे.

सुजात आंबेडकर यांनी म्हटले आहे की, काल रात्री बाळासाहेबांना छातीत दुखत होते आणि अस्वस्थ वाटत होते. म्हणून त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. त्यांची अँजीओग्राफी करण्यात येणार आहे. त्यानंतर जो रिपोर्ट येईल त्यानुसार पुढील उपचार डॉक्टर कळवतील तसे आम्ही तुम्हाला सोशल मीडियाच्या माध्यमातून कळवू. आम्ही डॉक्टरांच्या रिपोर्टसाठी थांबलो आहोत. जसा रिपोर्ट येईल तशी माहिती बाळासाहेबांच्या आणि वंचितच्या हॅण्डलवरून कळवण्यात येईल.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. बाळासाहेब आंबेडकर यांना छातीत दुखू लागल्याने गुरुवारी पहाटे (३१ ऑक्टोबर) पुण्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बाळासाहेब आंबेडकर यांच्या हृदयात रक्ताची गुठळी झाल्यामुळे त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून, येत्या तासाभरात त्यांची अँजिओग्राफी करण्यात येणार असल्याचेही वंचित बहुजन आघाडीच्या ट्विटर हॅण्डलवरून कळवण्यात आले आहे.

# निवडणूक निरीक्षक लालटनपुई व्हाँगचाँग यांच्याकडून स्ट्राँग रूमची पाहणी



**बीड । प्रतिनिधी**

गेवराई व माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) लालटनपुई व्हाँगचाँग यांनी काल (ता. ३०) माजलगाव विधानसभा मतदार संघाच्या स्ट्राँग रूमची पाहणी केली. तर आज गेवराई येथील स्ट्राँग रूमची पाहणी केली. त्याचबरोबर मिरकाळा, रामू नाईक तांडा आणि हरलाल तांडा येथील मतदान केंद्रांचीही पाहणी केली. त्यांच्यासमवेत गेवराई विधानसभा मतदार संघ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी संदीप खोमणे, माजलगावचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी संतोष रुईकर होते.

# भेंडाळा फाट्यावर अडीच लाख रुपये जप्त नाकाबंदीदरम्यान पोलिसांची कारवाई

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

कायगाव : भेंडाळा फाटा येथे तपासणीदरम्यान पोलिसांनी मंगळवारी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास एका कारमधून अडीच लाखांची रोख रक्कम जप्त केली. याप्रकरणी गंगापूर पोलिस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर- पुणे राष्ट्रीय महामार्गावरील भेंडाळा फाटा येथे विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने वाहनांची नाकाबंदी करून मंगळवारी सकाळी साडेअकरा वाजता तपासणी करण्यात येत होती. यावेळी छत्रपती संभाजीनगरहून पुण्याकडे जाणाऱ्या कारला (एमएच २० जीव्ही ७०४३) थांबवून त्याची पाहणी करण्यात आली. यात कारमधील बॅगमध्ये ५०० रुपयांच्या नोटांचे पाच बंडल पोलिसांना आढळले. कारचालक



अशोक उत्तमराव वाळेकर, (रा. कमळापूर रोड, बजाजनगर, वाळूज, जि. छत्रपती संभाजीनगर) यांच्याकडे या रोख रकमेबाबत पोलिसांनी चौकशी केली. त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यानंतर चालकास रोख रक्कम आणि कारसह गंगापूर पोलिस ठाण्यात नेण्यात आले. यावेळीही कारचालक अशोक वाळेकर याने रोख रकमेच्या मालकी हक्काबाबत समाधानकारक उत्तर दिले नाही किंवा कोणतीही वैध कागदपत्रे सादर केली नाहीत. त्यामुळे याबाबत उपनिरीक्षक संतोष झोरे यांच्या फिर्यादीवरून गंगापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिक्षण महर्षी शामराव गदळे यांची पुण्यतिथी निमित्त मोफत आरोग्य शिबिर व इंदुरीकरांचे कीर्तन

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील दहिफळ (वड.) येथील वडमाऊली विद्या सारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी शामराव गदळे गुरुजी व बाळूताई गदळे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने शनिवार दि. २ नोव्हेंबर रोजी विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन दहिफळ (वड.) येथे करण्यात आले आहे. शनिवार रोजी सकाळी ०८ ते १० वेळेत रक्तदान शिबिर, १० ते ०१ दरम्यान मोफत आरोग्य तपासणी शिबीर, ०१ ते ०४ भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांच्यासह डॉ. बालासाहेब कराड, डॉ. अनंत मुळे, डॉ. अमोल गीते, डॉ. गणेश देशमुख, डॉ. सुरेश ठोंबरे, डॉ. रामप्रभू




तिडके, डॉ. रोहन गायकवाड, डॉ. लक्ष्मण मोरे, डॉ. चंद्रकांत तोंडे, डॉ. प्रतीक्षा बावरे, डॉ. गंगाराम डोंगरे, डॉ. शालिनीताई कराड,डॉ. शशिकांत दहिफळकर आदी आरोग्य क्षेत्रातील महनिय व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. याच दिवशी शनिवारी सायंकाळी ०४ते०७ या वेळेत समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमाचा लाभ दहिफळ (वड.) व पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून घेण्याचे आवाहन श्री. सकाहरी तात्या गदळे, डॉ. शशिकांत दहिफळकर,श्री. शरद शामराव गदळे, डॉ.शालिनीताई कराड यांनी केले आहे

# स्वत: चे दु:ख विसरून इतरांच्या सुखदु:खात सहभागी होणे हीच खरी मानवता-अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे

## दीपावली निमित्ताने प्रियदर्शनी क्रीडा मंडळाच्या वतीने फराळाचे वाटप;मागील ३५ वर्षापासूनची परंपरा जोपासली

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

स्वत:चे सुख किंवा दु:ख विसरून इतरांच्या सुखदु:खात सामील होणे हीच खरी मानवता असल्याची भावना स्वा रा ती रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांनी व्यक्त केली.

अंबाजोगाई शहरातील प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने दिपावली निमित्त स्वाराती रुग्णालयात रुग्णांना फराळाचे वाटप करतांना बोलत होते.

स्वाराती रुग्णालयात रुग्ण व नातेवाईक यांची दिवाळी गोड होण्यासाठी त्याना फराळाचे वाटप प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली गोड करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रियदर्शनी क्रीडा मंडळ हे रुग्णसेवेची सामाजिक परंपरा जोपासण्याचे कार्य करीत आहे. हीच परंपरा पुढे जोपासत दि.३१ ऑक्टोबर गुरुवार रोजी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रूग्णालय येथील रूग्णांना राजकिशोर मोदी मित्र मंडळाच्या वतीने दिवाळी फराळ वाटप करण्यात आला.

गेल्या ३५ वर्षापासून आजपर्यंत अखंडीतपणे रूग्णालयातील रूग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना दिवाळी फराळ वाटपाची परंपरा प्रियदर्शनी क्रीडा मंडळाची आहे. आपण दीपावलीच्या सणापासून कुठेतरी दूर आहोत अशी भावना रूग्णांची व नातेवाईकांची होवू नये या सामाजिक दायित्वातून तसेच रुग्ण व नातेवाईक यांची रुग्णालयातील मानसिकतेतून त्यांना बाहेर काढून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याची परंपरा मंडळाने सुरू केली आहे.

दीपावली निमित्त फराळ वाटपात गेली ३५ वर्ष सातत्य टिकवलेले आहे याबद्दल अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी प्रियदर्शनी क्रीडा मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. मंडळामार्फत विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम, विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा मानस केला.त्याचाच एक भाग म्हणून स्वाराती येथील रुग्णांसाठी हा दिपावली फराळ वाटपाचा कार्यक्रम सुरू केला. हे उपक्रम आजतागायत अविरतपणे सुरू आहेत. दिवाळी फराळ वाटप करत असताना रूग्णांना दीपावलीच्या शुभेच्छा देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविण्याचे काम मोदी यांचे सहकारी करत आहेत .

दिपावली निमित्त स्वाराती रुग्णालयात फराळ वाटपाच्या कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ.शंकर



धपाटे, डॉ.नागेश अब्दगिरे, ऍड. विष्णुपंत सोळंके, मनोज लखेरा, महादेव आदमाने, अमोल लोमटे, दिनेश भराडीया, धम्मा सरवदे , चंद्रकांत गायकवाड, सुनील वाघाळकर ,माणिक वडवणकर, गणेश मसने, कचरू सारडा,बबन पानकोळी, रुपेश चव्हाण, अकबर पठाण, अशोक देवकर,काझी खयामोद्दीन , अंकुश हेडे,विजय रापतवार , राजू मोरे, सुधाकर टेकाळे, मतीन जरगर, गोविंद पोतंगले, सुभाष पानकोळी , अकबर पठाण, मुक्तार शेख, खलील जाफरी, सय्यद ताहेर, सचिन जाधव, शाकेर काझी, जावेद गवळी,दत्ता सरवदे, विशाल पोटभरे, सय्यद रशीद , आकाश कऱ्हाड, शुभम लखेरा, नियामत पठाण, कैलास कांबळे, सुदाम देवकर, जमादार पठाण , शाहिद शेख,महेबूब गवळी, विशाल जगताप, विश्वजित शिंदे ,जावेद इस्माईल गवळी, अजीम जरगर , वजीर भाई, दत्ता हिरवे, सुशील जोशी, रोहन कुरे, आशिष ढेले, जावेद भाई, रोहित हलगुंडे, मुन्ना वेडे, सुशील जोशी, मारुफ शेख, कपिल संकाये, रोशन लाड यांच्यासह प्रियदर्शनी क्रीडा सांस्कृतिक मंडळाचे सहकारी , राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि राजकिशोर मित्र मंडळाचे सर्व सहकारी सदस्य उपस्थित होते.

# प्रस्थापितांच्या बरोबरीने वंचितांना व्यासपीठ देणारे एकता फाऊंडेशन-बाळासाहेब कोठुळे

## एकता फाउंडेशन च्या पाथर्डी तालुका शाखेचे उद्धाटन

**शिरूर कासार । प्रतिनिधी**
जातीभेद, धर्मभेद न करता श्रेष्ठ कनिष्ठ या मर्यादा सोडून देऊन सर्वांना सोबत घेऊन चालणारे, सर्वांच्या हिताची काळजी घेणारे एकता फाउंडेशन म्हणजे सर्वसामान्यांचे हक्काचे व्यासपीठ आहे असे प्रतिपादन पत्रकार बाळासाहेब कोठुळे यांनी केले. दि.३० रोजी पाथर्डी शहरामध्ये एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या तालुका शाखेचा उद्धाटन समारंभ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक अनंत कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत व शंकर महाराज मठाचे मताधिपती प.पु.माधव बाबा यांच्या शुभहस्ते संपन्न झाला याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ.सपना काटे तर प्रमुख मान्यवर म्हणून पत्रकार अविनाश मंत्री, संजय मेहकर उपस्थित होते. यावेळी संदीप काटे, एकताचे नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष कवी राजेंद्र उदारे यांच्यासह एकताचे सचिव पत्रकार गोकुळ पवार, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, संस्थापक सदस्य राजेश बीडकर, एकताचे राज्य प्रवक्ते मल्हारी खेडकर, प्रदेश संघटक देविदास




शिंदे, अहिल्यानगर जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बाळासाहेब कोठुळे, आजिनाथ डोमकावळे आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर विराजमान होते.
वेदनेला फुंकर माणुसकीची ही ब्रीदवाक्य घेऊन एकता फाउंडेशन संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कार्य करत असून सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्राबरोबरच पर्यावरण क्षेत्रातही हिरीरीने आणि निरपेक्ष भावनेने काम करत आहे. फाउंडेशन मधील सहभागी सभासदांबरोबरच इतरांच्याही सुख दुःखामध्ये आधार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सुद्धा एकता परिवार करतो. दीन-दलित, दुःखी वंचितांना मदतीचा हात देण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून केले जाते. समाजहिताचा दुर्दम्य आशावाद डोळ्यासमोर ठेवून अखंडपणे चालणारी ही मानवसेवा संस्थेच्या माध्यमातून आपण करत असल्याचे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड यांनी यावेळी आपल्या मनोगतात सांगितले. स्वास्तिक वाचनालयाच्या संचालिका तथा कार्यक्रमाच्या अध्यक्षा सपना काटे यांनी एकदा फाउंडेशनच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. सामाजिक कार्यकर्ते संजय मेहकर यांनी यावेळी शास्त्रीय संगीतातील सुरेल धून आणि 'मोगरा फुलला' हे भजन बासरीवर वाजवत उपस्थित रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून टाकले आणि कार्यक्रम एका उंचीवर नेऊन ठेवला. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.
कार्यक्रमाच्या द्वितीय सत्रामध्ये काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी ह.भ.प.निवृत्ती महाराज कानवडे (संगमनेर) तर उद्धाटक म्हणून जेष्ठ साहित्यिक अनंत कराड (बीड) तर प्रमुख मान्यवर म्हणून कवी गोरख पवार (नेवासा) हे उपस्थित होते. या काव्य संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन कवीवर्य पत्रकार बाळासाहेब कोठुळे यांनी केले. काव्य संमेलनात बाळासाहेब मनतोडे (राहुरी), आत्माराम शेवाळे (वाघोली), शशिकांत गायकवाड (पाथर्डी), महेश लाडणे (अमरापूर), देविदास शिंदे (बालमटाकळी), चंद्रकांत उदागे (पाथर्डी), सुरेश वैरागर (सोनई) राजेंद्र उदारे (पाथर्डी) या सर्व मान्यवर कवींनी सहभाग नोंदवून वेगवेगळ्या विषयावरील कविता सादर करत काव्यरसिकांना दिलखुलास हसवले तर कधी अंतर्मुख केले. ज्वलंत सामाजिक आशयासह कौटुंबिक विषयालाही हात घालणाऱ्या काही रचनाही या संमेलनात सादर झाल्या. तर भावनेचा वेध घेणाऱ्या कवितांनी उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. राजकीय विषयावरील वात्रटिका व कवितांनाही रसिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.
या कार्यक्रमास रागिनी उदारे, हुमायून आतार, ह.भ.प.अमोल सोळसे, संदीप काटे, कृष्णा रेपाळ, सुभाष भागवत, योगेश इधाटे, सचिन लगड, नवनाथ तरटे, मेजर आनंद पंडागळे, म्हातारदेव ढाळे, आत्माराम शास्त्री बिडवे, नंदकिशोर औटी, पत्रकार अनिल खाटेर, रामभाऊ घोडके, रामनाथ बंग, दादाभाऊ ढमाळ, अरुण ताठे, कारभारी शिंदे, गणेश वाघ, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# दिवाळी निमित्ताने निराधार,दिव्यांग व भक्तीप्रेम आश्रमात फराळाचे वाटप

## रोटरीने केली उपेक्षितांची दिवाळी गोड

**अंबाजोगाई । परवेज पटेल**
शहर व परिसरातील निराधार,दिव्यांग,मनोरूग्ण व भक्तीप्रेम आश्रमात दिवाळीच्या फराळाचे वाटप करून रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी ने उपेक्षितांची दिवाळी गोड केली.
गुरुवारी सकाळी मानवलोक जनसहयोग कार्यालय येथे दिवाळी फराळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्त्या कल्पना लोहिया होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध व्यापारी जुगलकिशोर सारडा, प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ.नवनाथ घुगे, रोटरीचे प्रांत संचालक प्रवीण चोकडा, प्रा.संतोष मोहिते, प्रा.रोहिणी पाठक, आनंद कर्णावट, डॉ.निशिकांत पाचेगावकर, मोईन शेख, जगदीश जाजू , रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, प्रोजेक्ट डायरेक्टर अविनाश मुडेगावकर, को.प्रोजेक्ट डायरेक्टर राम सारडा, मानवलोक जनसहयोग चे शाम सरवदे, संजना आपेट, दिलीप मारवाळ, सचिन गायकवाड यांची उपस्थिती होती.




यावेळी बोलताना कल्पना लोहिया म्हणाल्या की, रोटरी क्लब गेल्या ११ वर्षा पासून सातत्याने हा उपक्रम राबवून उपेक्षितांच्या जीवनात गोडवा निर्माण करत आहे. समाजातील सर्व घटकांना न्याय देता आला पाहिजे. असे त्यांनी सांगितले.
यावेळी डॉ.नवनाथ घुगे, प्रवीण चोकडा, प्रा. रोहिणी पाठक यांनी आपले मनोगत व्यक्त केले.
या कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनराज सोळंकी यांनी केले.संचलन भीमाशंकर शिंदे यांनी तर उपस्थितांचे आभार राम सारडा यांनी मानले.
यावेळी प्रवीण मार्कंडेय, भागवत कांबळे, विश्वनाथ लहाने,डॉ.अनिल केंद्रे, अजित देशमुख, प्रा.रमेश सोनवळकर, शिवकुमार निर्मळे, सचिन बेंबडे, प्रा.अजय पाठक, राधेश्याम लोहिया,डॉ.सुरेश अरसुडे, पुरुषोत्तम रांदड, गणेश घाडगे, प्रदीप झरकर यांच्यासह रोटरी क्लब चे सदस्य उपस्थित होते.

# दीपावली सणानिमित्त नागरिकांची भेट घेऊन संवाद साधला; आ.मुंदडा यांनी जनतेस दिल्या शुभेच्छा

**अंबाजोगाई । परवेज पटेल**
महायुतीच्या अधिकृत उमेदवार आ.नमिता अक्षय मुंदडा यांनी अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांची भेट घेऊन संवाद साधत त्यांना दीपावली सणानिमित्त शुभेच्छा दिल्या. जागोजागी आ.मुंदडा यांचे नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वागत करण्यात आले.
केज विधानसभा मतदारसंघासाठी भाजप - महायुतीतर्फे उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर दीपावली सणाच्या पार्श्वभूमीवर आ.नमिता अक्षय मुंदडा यांनी मंगळवारी आणि बुधवारी अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांची विविध ठिकाणी भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी ठिकठिकाणी संवाद साधताना आ.नमिता अक्षय मुंदडा यांनी सांगितले की, केजच्या जनतेने २०१९ मध्ये मला सर्वप्रथम आमदार केले मिळालेल्या संधीचे मी व मुंदडा कुटुंबियांनी आपल्या सर्वांच्या सहकार्याने व आशिर्वादाने विकास कामे करून सोने करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. मागील पाच वर्षांत आम्ही जनतेसाठी पूर्ण वेळ उपलब्ध राहिलो आहोत. या काळात आमचे मार्गदर्शक काकाजी, अक्षयजी व मी आम्ही जनतेची तत्परतेने सेवा केली. आता पाच वर्षे संपली आहेत. आम्ही पुन्हा नव्याने परीक्षेसाठी सज्ज झालो आहोत. आम्हाला



विश्वास आहे. की, जनता आम्हाला या परीक्षेत ही पुन्हा उत्तीर्ण करेल. जनता आम्हाला परत एकदा पाच वर्षांसाठी निवडून देईल. सर्वांना सोबत घेऊन काम करीत असताना सगळ्या समाजाला न्याय मिळाला पाहिजे अशी आमची भूमिका कालही होती आजही कायम आहे. या पाच वर्षांत जे करता आले नाही. ते पुढील पाच वर्षांत करण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करू असा विश्वास आमदार नमिता मुंदडा यांनी विविध ठिकाणी व्यक्त केला. यावेळी त्यांनी छत्रपती नगर येथील नागरिकांशी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विकासकामांच्या अनुषंगाने विविध विषयांवर संवाद साधला. तसेच नागरिकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी परिसरातील मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते. अंबाजोगाई येथील पेशवा प्रतिष्ठान यांच्या वतीने, उद्योग आरंभ महा एक्स्पो -२०२४ ला भेट देऊन दिवाळी विषयक वस्तूंच्या खरेदीची प्रक्रिया व माहिती जाणून घेतली. या निमित्ताने उपस्थित नागरिक बंधू-भगिनी यांच्याशी संवाद ही साधला. तसेच अंबाजोगाई येथील जैन गल्लीत भगवान महावीर यांच्या आरतीस उपस्थित होते. यावेळी महिला, पुरूष आदी समाजबांधव उपस्थित होते. दरम्यान लहान मुलांनी विविध स्पर्धेत सहभाग घेऊन यश संपादन केल्याबद्दल त्यांना पारितोषिके दिली. या प्रसंगी उपस्थित असलेल्या भाविक भक्तांनी आमदार मुंदडा यांचा सत्कार केला व विविध विषयांवर संवाद ही साधला. यावेळी त्यांच्यासोबत महायुतीतील घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सचिन तिडकेचा खुन ऊसतोड मजूर पुरविण्यासंबंधी झालेल्या आर्थिक व्यवहारातून ;तीन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**
अंबाजोगाई तालुक्यातील डोंगर पिंपळा येथील सचिन तिडके या ३५ वर्षीय तरुणाचा डोक्यात दगड घालून खून केल्याची घटना बुधवारी समोर आली होती. या घटनेमुळे सर्वत्र खळबळ उडाली.या खून प्रकरणाचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले असून ऊसतोड मजूर पुरविण्यासंबंधी झालेल्या आर्थिक व्यवहारातून यमराज राठोड या युवकाने अन्य दोन साथीदाराच्या मदतीने सचिनचा दगडाने ठेचून खून केल्याचे उघडकिस आले आहे. याप्रकरणी सचिनचे वडील शिवाजी सिताराम तिडके (रा. भोगलवाडी ता. धारूर) यांच्या फिर्यादीनुसार सचिन मागील दोन वर्षापासून त्यांची सासरवाडी डोंगर पिंपळा येथे राहत होता.व तेथील स्थानिक लोकांची बटाईने शेती करत होता. तसेच तो ऊसतोड कामगार व ट्रॅक्टरचा साखर कारखान्याला पुरवठा करत असे. यावेळी त्याचे संबंध हेमराज राठोड यांच्याशी आला होतो. तो एक महिन्यापासून सचिन बरोबर राहत होता. सचिन बरोबर ऊस तोडणीसाठी जाणार होता. परंतु नंतर त्याचा सचिन बरोबर जाण्याची इच्छा नव्हती. दि.२९ ऑक्टोबर मंगळवार रोजी त्याने तीन ऊसतोड मजूर देतो म्हणून सचिनला घरातून घेऊन गेला. त्यानंतर यमराज त्याचे दोन साथीदार हे सचिनला घेऊन तो बटाई करत असलेल्या शेतात गेले तेथे त्या तिघांनी सचिनला भरपूर दारू पाजली. यावेळी ऊसतोड मजूर पुरविण्यासंबंधित झालेल्या आर्थिक व्यवहारातून झालेल्या आर्थिक व्यवहारातून त्यांनी सचिनचा दगडाने ठेचून खून केला.
अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात यमराज राठोड आणि दोन अनोळखी व्यक्तीवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात कुणाचा गुन्हा नोंद झाला आहे. घटनेपासून तिन्ही आरोपी फरार असून ग्रामीण पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र घुगे हे पुढील तपास करत आहेत

# उमेदवारी माघार घेण्यासाठी स्वत: अर्ज सादर करा - गौरव इंगोले

**बीड । प्रतिनिधी**
माजलगाव विधानसभा मतदारसंघासाठी नामनिर्दिष्ट उमेदवारांनी उमेदवारी माघार घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, तहसील कार्यालय, माजलगाव येथे सकाळी ९.४५ ते ५.४५ वाजता व दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत स्वत: हजर होऊन सादर करावेत. दिनांक ०१ नोव्हेंबर २०२४ ते ०३ नोव्हेंबर २०२४ या तिन्ही दिवशी शासकीय सुटी असल्याने कार्यालयास उमेदवारी माघार घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज सादर करता येणार नाही. तसेच दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजेनंतर चिन्ह वाटप करण्याची सुरूवात होईल, चिन्ह वाटपाची प्रक्रिया भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसारच चिन्ह वाटप करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे माजलगाव विधानसभा मतदार संघ निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी कळवले आहे.

# केज शिवसेनेच्या नांदुर (घाट) उपतालुका प्रमुख पदी कैलास उगलमुगले यांची नियुक्ती



**केज । प्रतिनिधी**
शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना. एकनाथरावजी शिंदे साहेब संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे साहेब शिवसेनेचे सचिव संजयजी मोरे साहेब यांच्या कार्याला प्रेरित होऊन माननीय शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन (भैय्या) मुळूक यांच्या मार्गदर्शनाखाली श्री कैलास उगलमुगले यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश केला व ...... त्यांना नांदुर (घाट) जि.प. सर्कलच्या उपतालुकाप्रमुख पदी नियुक्ती देऊन शुभेच्छा देताना शिवसेनेचे केज तालुकाप्रमुख पंजाबराजे देशमुख , शिवसेनेचे केज विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे ,युवा सेनेचे उपतालुकाप्रमुख शिवाजी गायकवाड आदी उपस्थित होते.

# मनोज वाघमारे यांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या उपजिल्हाप्रमुख पदी निवड

## बाजीराव दादा चव्हाण यांनी रुग्णसेवेला दिला योग्य न्याय

**बीड । प्रतिनिधी**
आपल्या सामाजिक व रुग्णसेवेतील कार्यामुळे एक आगळी वेगळी ओळख निर्माण करणारे बीड येथे हॉस्पिटल मधील कोणाच्याही अडचणीला कधीही धावून जाणारे, अनेक गरजू रुग्णांच्या हाकेला ओ देणारे मनोज वाघमारे यांची वंदनीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या उपजिल्हाप्रमुख पदी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.एकनाथ शिंदे साहेब व मा. खासदार डॉ.श्रीकांत शिंदे साहेब,धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा युवासेना मराठवाडा निरीक्षक मा.बाजीराव दादा चव्हाण साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्याचे कक्षप्रमुख मा.राम राऊत साहेब व मुख्यमंत्री सहायता निधी कक्षप्रमुख मंगेशजी चिवटे साहेब यांच्या आदेशावरून व बीड जिल्हाप्रमुख महादेवजी मातकर यांच्या सूचनेनुसार निवड करण्यात आली. यावेळी धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा युवा सेना मराठवाडा निरीक्षक आरोग्यदूत बाजीराव दादा चव्हाण, युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश भाऊ जाधव, युवासेना




जिल्हाप्रमुख सुमित कोळपे,अजय सुरवसे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव मातकर, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उपजिल्हाप्रमुख शरद झोडगे, शहर प्रमुख कपील जोगदंड आदी पदाधिकारी उपस्थित होते. निवडीमुळे मनोज वाघमारे यांचे जिल्ह्यात सर्वत्र स्वागत व शुभेच्छा येत आहेत.

### पक्ष फोडला, घरे फोडली,जनता मात्र आमच्या बाजूने

# १५०० रुपये देऊन महिलांची मते विकत घेता येणार नाहीत-खा.सुप्रिया सुळे यांची टीका

**अकलूज (वृत्तसंस्था)**–पक्ष फोडून थांबले नाहीत त्यांनी घरेही फोडली. परंतु जनता आमच्या बाजूने आहे. एखादा सोबत नाही आला तर कारखान्याला नोटीस, सोबत आला तर लगेच ८०० कोटी दिले जातात. गेली दोन वर्षे प्रचंड त्रास दिला. भाजप व त्यांच्या कटकारस्थानाविरोधात ही लढाई असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादीच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केले. येथील विजय चौकातील सभेत त्या बोलत होत्या.

या वेळी खासदार सुळे म्हणाल्या, माझ्या ८० वर्षे वयाच्या वडिलांना निवडणूक आयोग, सुप्रीम कोर्टात तासन्तास घालवावे लागले. माझ्या मुलीचा २५ वा वाढदिवस मला सुप्रीम कोर्टात साजरा करावा लागला. मागच्या निवडणुकीला मी व श्रीनिवास दादा बारामतीतून फिरताना लोक दरवाजे लावून घेत होते. एवढी या लोकांची दहशत होती. कारखानदार, सर्व संस्थांचे पदाधिकारी त्यांच्याकडे तर मतदार माझ्याकडे होते, हे नंतर निकालावरून समजले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाने सामान्यांच्या मताला ताकद दिली आहे. त्यामुळे तुमचे ते मतच ही परिस्थिती बदलू शकते. १५०० रुपये देऊन महिलांची मते विकत घेता येणार नाहीत, त्यासाठी मोठं मनच लागते, असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रमासाठी तालुक्यातील काँग्रेस, शिवसेना व राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# मुंदडा म्हणजे विकासासाठी कठिबद्ध असणाऱ्या आमदार काल,आज नि उद्या




**केज । प्रतिनिधी**

लोक प्रतिनिधी जनता विश्वासपूर्ण निवडुन देते त्याचे कारणही तसेच आहे .मतदार हे प्रत्यक्ष कोणतेही कार्य वा विकास करू शकत नाहीत तर आपल्या तालुक्याचा विकास सर्वांगाने व्हावा यासाठी मतदान रूपाने आपले स्वातंत्र्य विश्वास पूर्ण लोकप्रतिनिधीला मतदान करून बहाल करते. केज विधानसभेच्या माध्यमातून केज शहर, तालुक्यातील सर्वांगीण विकास करण्यासाठी पाठीमागील अनेक वर्षापासून कार्य करणारे मग त्यामध्ये पाण्याचा प्रश्न असेल पथदिव्यांचा असेल रस्त्यांचा असेल मंदिरांचा तसेच समाज मंदिरांचा असेल असे अनेक प्रश्न घेऊन मुंदडा कुटुंब सातत्याने केज विधानसभा क्षेत्रात कार्य करत आहे. त्यांच्या कार्यकर्तुत्वाचा ठसा त्यांनी सामाजिक कार्यातून निर्माण केला आहे. त्यामध्ये मा.आमदार नमिताताई मुंदडा यांनी केज विधानसभेच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी केज शहर,अंबाजोगाई शहर तथा तालुक्यात खेचून आणुन विकासकामे केली म्हणुनच केज विधासभेच्या आमदार नमिता मुंदडा विकासासाठी कटीबद्ध आहेत काल आज आणि उद्या.

### फडणवीसांनीच आरोप केले,त्यांनीच फाईल दाखवली

# ७० हजार कोटींचा घोटाळा झाला ही नाही,त्यांनीच सांगावे : सुप्रिया सुळे

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आर. आर. पाटील यांनी ७० हजार कोटीच्या सिंचन घोटाळ्याच्या चौकशीच्या फाईलवर सही केली होती, असा गौप्यस्फोट अजित पवार यांनी केला होता. या विधानावरुन खासदार सुप्रिया सुळे यांनी अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. घोटाळ्याचे आरोप फडणवीसांनीच केले. त्यांनीच फाईल दाखवली. त्यामुळे ७० हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाला की नाही, हे त्यांनीच सांगावे, असे आव्हान सुळे यांनी फडणवीसांना केले आहे.

आमचे आणि आर. आर. पाटलांच्या कुटुंबाचे अनेक वर्षांचे कौटुंबिक संबंध आहेत. अजित पवारांनी आर.आर. पाटील यांच्याबाबत केलेले वक्तव्य वेदनादायी होते. मी आबांच्या कुटुंबीयांची फोन करुन माफी मागितली, असेही सुप्रिया सुळे यांनी सांगितले.सुप्रिया सुळे म्हणाल्या, आरोप कधी झाले, त्या फाईलवर सही कधी झाली आणि त्या फाईलचे पुढे काय झाले याचे उत्तर देवेंद्र फडणवीस हेच देऊ शकतात. आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केले, त्यामुळे या सगळ्याचे उत्तर त्यांनाच द्यावे लागेल. ७० हजार कोटींचा घोटाळा झाला की नाही, हे सांगायला पाहिजे.७० हजार कोटींचा आरोप झाला तेव्हा आमचा पक्ष एक होता. या घोटाळ्याचा आरोप फडणवीस यांनी केला. त्याची चौकशी व्हावी, अशी मागणीही त्यांनीच केल्याचे महाराष्ट्राने पाहिले आहे. आर. आर. पाटील यांना मानले पाहिजे. विरोधी पक्षांनी घोटाळ्याचा आरोप केला, तेव्हा चौकशी राज्याच्या हिताची झाली पाहिजे, असे त्यांना वाटले असेल. इमनादार व्यक्ती म्हणून त्यांनी सही केली असेल. आता या घोटाळ्यात काही होते की नव्हते, हे सांगायला पाहिजे, असेही सुळे म्हणाल्या.

# सर्वपक्षीय नेत्यांचा एकत्रित दिवाळी फराळ

**पुणे (वृत्तसंस्था)**

राज्यातील विधानसभा निवडणुकांचा सुरू असलेला रणसंग्राम, त्यात होणारे बेछूट आरोप – प्रत्यारोप, त्यामुळे तापलेले वातावरण, वर्षानुवर्षांचे हेवेदावे, कुरघोडीचे राजकारण... सगळं काही बाजूला ठेवून राजकीय पक्षांचे दिग्गज नेते, आमदार, खासदार, विधानसभा निवडणुकीतील उमेदवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी एकत्रितपणे दिवाळी फराळाचा मनमुराद आनंद घेतला. राजकारणात एकमेकांचे विरोधक तसेच प्रतिस्पर्धी उमेदवारांनी गळाभेट घेऊन एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

दिशा सोशल फाऊंडेशनच्या वतीने यंदा आठव्या वर्षी दिवाळी फराळाचे आयोजन करण्यात आले. वाकड येथील हॉटेल बर्ड व्हॅलीत झालेल्या या कार्यक्रमात खासदार श्रीरंग बारणे, डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार अमर साबळे, आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार ड. गौतम चाबुकस्वार, माजी महापौर संजोग वाघेरे, दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण तरडे, नाट्यनिर्माते राहुल भंडारे, राज्य नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, पिंपरी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, शहराध्यक्ष शंकर जगताप, सचिन चिखले, माजी शहराध्यक्ष वसंत लोंढे, राहुल कलाटे, योगेश बाबर, सचिन साठे, माजी नगरसेवक जगदीश शेट्टी, शत्रुघ्न काटे, मयूर कलाटे, सुरेश भोईर, धनंजय काळभोर, तुषार हिंगे, बाळासाहेब मोरे, संतोष कांबळे, महेश कुलकर्णी, अमित बाबर, विशाल यादव, प्रेरणा बँकेचे अध्यक्ष कांतीलाल गुजर, इंद्रायणी बँकेचे संस्थापक ड. एस. बी. चांडक, उपायुक्त अण्णा बोदडे, सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी अशोक मुंढे, संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे संचालक बाळासाहेब विनोदे आदींनी हजेरी लावली.

### प्रचंड जनसमुदायच्या उपस्थितीत राज्याचे महसूलमंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांनी

# उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणुकीच्या रिंगणात आम्हीच शिर्डी मतदार संघातून पुन्हा एकदा बाजी मारणारच

**राहाता । प्रतिनिधी**

ठेकेदार आणि माफीयांच्या जीवावर राजकारण करण्यासाठी काही लोकं आपल्या भागात येत आहेत. परंतू या भागातील जनता त्यांना थारा देणार नाही. त्यांच्या तालुक्यातच त्यांची निष्क्रीयता उघड झाली आहे. केवळ हसून दुस–याची जिवविणे एवढेच काम संगमनेरच्या नेत्यांनी आजपर्यंत केले असल्याचा टोला महसूल तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी महायुतीच्या वतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल करुन, मंत्री विखे पाटील यांनी विजय संकल्प मेळाव्यातून पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदारांशी संवाद साधला. जेष्ठनेते आण्णासाहेब म्हस्के पाटील, आ.आशुतोष काळे, डॉ.सुजय विखे पाटील, सौ.शालिनीताई विखे पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, शिवसेनेचे सागर बोठे, भाजपाचे तालुका अध्यक्ष दिपक रोहोम, ओबीसी आघाडीचे बाळासाहेब गाडेकर, मुस्लिम समाजाचे जेष्ठनेते रऊफ मौलाना, सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, मुकूंदराव सदाफळ आदि याप्रसंगी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले की, महायुती सरकारच्या माध्यमातून या मतदार संघातील खंडकरी शेतक–यांचा प्रश्न सोडवून शेतक–यांना न्याय देता आला. निळवंडे कालव्याचे पाणी दिलेल्या शब्दाप्रमाणे आणून दाखविले. तरुणांच्या रोजगारासाठी औद्योगिक वसाहतीची उभारणी सुरु झाली. आपल्या सर्वांच्या आशिर्वादाने ही लोकहिताची कामे करता आली. केवळ आपला मतदार संघच नाही तर जिल्ह्याच्या नामांतरा बरोबरच नेवासे येथील ज्ञानेश्वर श्रृष्टी , अहिल्यादेवींचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याचा महत्वपूर्ण घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.एक रुपयात पीक विमा योजनेचा मोठा लाभ शेतक–यांना मिळाला आहे. मोफत वीज देण्याचा निर्णयही घेतला आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला मिळालेल्या प्रतिसादामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांना धडकी भरली आहे. योजना बंद पाडण्यासाठी महाविकास आघाडीचे नेते न्यायालयात गेले. आता मतं मागायला दारात येतील तेव्हा त्यांना जाब विचारा असे आवाहन करुन, महाविकास आघाडीकडे सांगायला काही राहीलेले नाही. फक्त कोन बनेगा करोडपती याची स्पर्धा सुरु असल्याची टिका त्यांनी केली.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी शिर्डीत येवून केलेल्या आरोपांना उत्तर देताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, तुम्ही आमच्याकडे येवून काही बोलायचे, ती तुमच्यासाठी लोकशाही असते, आम्ही थोडी टिका केली तर, लगेच लोकशाही धोक्यात असल्याचा आरोप करता, लोकशाही कुठेही धोक्यात नाही, तुमचे पद धोक्यात आले आहे. त्यामुळेच थोड्याशा आरोपांमुळे तुम्ही अस्वस्थ झाला आहात. वाळु माफीया आणि एंजटांना पुढे करुन, डॉ.सुजय विखे पाटील यांच्यावर हल्ला करण्याचा कट रचल्याच्या आरोपाचा पुनरुच्चार करुन, वसंतराव देशमुख यांच्या वक्तव्याचे आम्ही कधीही समर्थन केले नाही. उलट त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. पण



ज्या निष्पाप महिलांना झाली, त्यांची माफी मागण्याचीही तुमची दानत नाही.टोळ्या आणि माफीयांच्या जीवावर राजकारण करुन, आम्ही कशी दहशत निर्माण करु शकतो हा संगमनेरच्या नेत्यांचा चेहरा आता राज्याला दिसला आहे. राहाता तालुक्यातील जनता ही खोट्या भूलथापांना बळी पडणार नाही. गणेश कारखाना चालवायला घेतला म्हणून तो शेतक–यांच्या मालकीचा राहीला. यापुर्वीच तुम्ही घ्यायला पाहीजे होता. संस्थावर चर्चा करायची असेल तर एकदा समोरासमोर याच असे आवाहन देवून समन्याची पाणी वाटप कायद्याचे भूत तुम्ही जिल्ह्याच्या मानगुटीवर बसविले त्याची किंमत मोजावी लागली. महायुती सरकारने आता पश्चिम वाहीणी नद्यांचे पाणी पुर्वेकडे वळविण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे.विधानसभेची निवडणूक ही तुमच्या सर्वांची आहे, मताधिक्य देण्याचे काम तुमचे आहे. गावात आणि बुथवर चांगल्या पध्दतीने काम करा असे अवाहन करुन, विकासाच्या प्रक्रीयेत आणि आपल्या अन्नात माती कालविणा–यांना थारा देवू नका असे आवाहन त्यांनी केले. डॉ.सुजय विखे पाटील यांनी आपल्या आक्रमक भाषणात सांगितले की, मी चार सभा घेतल्या तर त्यांचे सिंहासन हालले, हीतर सुरुवात आहे. आता इकडे येवून तुम्ही काय करणार. ज्यांच्यासाठी येत आहात त्यांच्याकडून काही होणार नाही हे या तालुक्यातील जनतेला माहीत आहे. मात्र आमच्या तालुक्यात येवून खालच्या पातळीवर जावून बोललात तर आम्ही आता कायद्याच्या सर्व चौकटी सोडून उत्तर देवू. आमच्या सहनशिलतेला कमजोरी समजू नका असा इशाराही त्यांनी दिला. काल महाविकास आघाडीच्या सभा झाली. या सभेमध्ये हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा फोटोही बॅनवर टाकायची आठवण राहीली नाही. आता तरी जागे व्हा आणि उध्दव बाळासाहेब ठाकरे गटातील सैनिकांनो योग्य निर्णय घ्या असे आवाहनही त्यांनी केले.याप्रसंगी आण्णासाहेब म्हस्के पाटील, आ.आशुतोष काळे, मौलाना रऊफ, सुरेंद्र थोरात यांचीही भाषण झाली. सभेपुर्वी राहाता शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये मंत्री विखे पाटीलही दुचाकीवर बसून सहभागी झाले होते. व्यासपीठावर येताच लाडक्या बहीणींनी मंत्री विखे पाटील यांचे राख्या बांधून त्यांचे स्वागत केले.आमच्याकडे दशहत असती तर, संगमनेर साखर कारखान्याचे चेअरमन बाबासाहेब ओहोळ यांच्या भावाला पंचायत समितीच्या इमारतीचे काम आम्ही करु दिले असते का? उद्योपती मालपाणींना शिर्डीमध्ये साईतिर्थ पार्क उभा करावसा वाटला असता का? तुमचे भाऊ इंद्रजित थोरात यांनी राहाता तालुक्यात कोणालाही कमीशन न देता २० कोटी रुपयांचे कामे केली आहेत, मग त्यांना कोणती दहशत वाटली. तुमच्या तालुक्यातील लोकांचे प्रपंच आमच्या तालुक्यातुन सुरु आहेत याचा मलाही आनंद वाटतो.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077